Vidya Vikas Mandal's
**Sitaram Govind Patil Arts, Science and Commerce College, Sakri Tal. Sakri Dist. Dhule 424 304**

विद्या विकास मंडळाचे,
**सिताराम गोविंद पाटील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, साक्री ता. साक्री जि. धुळे ४२४ ३०४**

ESTD 1971

Affiliated to Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

NAAC Re-Accredited with "A Grade" (CGPA 3.03) 3rd Cycle ◆◆ ISO 9001:2015 CERTIFIED ◆◆ AISHE ID : C - 8825 ◆◆ College Code : 210026

Website : www.sgpcsakri.com | Email : vidyavikas2006@gmail.com | Ph : 02568-242323

# Academic Year 2023-24

## 7.3 Institutional Distinctiveness




# म.फुलेंनी शेतकरी, पददलितांना शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम केले : प्रा.सोनवणे

**साक्री, दि.२६ (प्रतिनिधी) – समस्त शेतकऱ्यांच्या, पददलितांच्या, शुद्राती–शूद्र व कष्टकऱ्यांच्या पायातील गुलामीच्या बेड्या तोडून त्यांना निसर्ग दत्त अधिकार उपभोगण्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम करण्याचे कार्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी केले, असे मत मराठी अभ्यास मंडळाचे माजी अध्यक्ष प्रा.एल.जी. सोनवणे यांनी व्यक्त केले.**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्या विकास मंडळाचे सिताराम गोविंद पाटील कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महात्मा फुले व्याख्यानमालेत शिकायचं कशासाठी? या




विषयावर ते बोलत होते. ऑनलाइन पार पडलेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून कबचौ उमवी जळगाव, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ.सचिन नांद्रे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे होते. प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.अनंत पाटील प्रसंगी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ सचिन नांद्रे यांनी केले.

प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे अध्यक्षीय समारोपात बोलताना म्हणाले की, राष्ट्रपिता महात्मा फुलेंनी घालून दिलेला वैचारिक वसा विद्यार्थ्यांना यशस्वी जीवन व्यतीत करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या विचारांचे पाईक होऊन विद्यार्थ्यांनी सक्षमपणे शिक्षणाची कास धरावी असे देखील मत त्यांनी प्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचलन सदर कार्यक्रमाचे समन्वयक डॉ.ज्ञानेश्वर चव्हाण यांनी तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.प्रदीप राठोड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समन्वय समितीचे डॉ.दीपक नगर–ाळे, रासेयो विभागीय समन्वय प्रा.विश्वास भामरे, डॉ.हसीन तडवी, डॉ.ज्योती वाकोडे, प्रा.सुरेंद्र सिंग मगर, शरद बोरसे यांनी प्रयत्न केले. ऑनलाइन पार पडलेल्या या व्याख्यानमालेत विद्यापीठ परिसरातील मान्यवर, विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## Academic Year 2023-24

सकाळ

# मोबाईल व्हॅनच्या माध्यमातून वैज्ञानिक प्रयोगांचा प्रचार-प्रसार

## कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा उपक्रम

■ सकाळ वृत्तसेवा

साक्री, ता. ११ : विद्यार्थ्यांपर्यंत विविध वैज्ञानिक प्रयोगांची माहिती पोचावी, विशेषतः आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना वैज्ञानिक प्रयोगाची ओळख व्हावी यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या संकल्पनेतील विज्ञान मोबाईल व्हॅन साक्री येथे पोचली असून, या व्हॅनमधील वैज्ञानिक प्रयोग पाहून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक प्रयोगांचे कुतूहल निर्माण होते आहे.



साक्री : न्यू इंग्लिश स्कूलमध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विज्ञान मोबाईल व्हॅनद्वारा विद्यार्थ्यांना माहिती देताना समन्वयक प्रा. डॉ. संजय घोष, डॉ. प्रीतम तोरवणे, उपस्थित प्राचार्य संजयकुमार पाटील, शिक्षक आदींसह विद्यार्थी.

गावागावांत, विशेषतः आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाच्या पलीकडे अनेक वैज्ञानिक प्रयोग समजावेत या अनुषंगाने विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या संकल्पनेतूनही विज्ञान मोबाईल व्हॅन तयार करण्यात आली आहे. ही व्हॅन एक चालती-फिरती वैज्ञानिक प्रयोगशाळाच आहे. यामध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, शरीरशास्त्र, गणिती क्रिया अशा विविध विषयांच्या ३० प्रयोगांचे सादरीकरण करण्यात आले. मोबाईल व्हॅनसोबत समन्वयक म्हणून प्रा. डॉ. संजय घोष, प्रा. डॉ. एस. टी. बेंद्रे, प्रा. डॉ. प्रीतम तोरवणे यांच्यासह कार्तिक शेळके, अनिरुद्ध मांगीरकर, भावेश पगारे, वाहनचालक एम. पी. राठोड शाळांमध्ये जाऊन विविध विज्ञान प्रयोगांची माहिती विद्यार्थ्यांना देत आहेत. यातून आदिवासी भागातील विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञानाचा प्रचार-प्रसार करण्याचे काम होते आहे.

विज्ञान मोबाईल व्हॅन कुसुंबा येथून साक्री येथे पोचली. साक्री येथील सी. गो. पाटील महाविद्यालय, आदर्श माध्यमिक विद्यालय, न्यू इंग्लिश स्कूल येथील विद्यार्थ्यांना या प्रयोगाचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. साक्री येथून पिंपळनेर, सुकापूर व बारीपाडा येथे ही व्हॅन पोचणार असून, त्यानंतर तिथून नंदुरबार जिल्ह्यातील विविध शाळा-महाविद्यालयांमध्ये जाणार आहे. विज्ञान मोबाईल व्हॅनच्या निमित्ताने अनेक वैज्ञानिक प्रयोग विद्यार्थ्यांना पाहण्यास मिळत असून, यातून विद्यार्थ्यांमध्येदेखील वैज्ञानिक कुतूहल निर्माण होण्यास मदत होते आहे. साक्री येथील सी. गो. पाटील महाविद्यालयात प्रशासकीय अधिकारी प्राचार्य डॉ. डी. एल. तोरवणे, प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, आदर्श माध्यमिक विद्यालयात प्राचार्य डी. एन. पाटील, न्यू इंग्लिश स्कूलमध्ये प्राचार्य संजयकुमार पाटील, विलास गोसावी, पराग नेरकर आदींसह विज्ञान शिक्षकांनी उपस्थित राहत विद्यार्थ्यांना याची माहिती करून दिली.

> “ आदिवासी भागातील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक प्रयोगांची माहिती पोचावी व त्यांच्यातील वैज्ञानिक कुतूहल वाढावे यासाठी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या संकल्पनेतील ही विज्ञान मोबाईल व्हॅन अतिशय स्तुत्य उपक्रम असून, यातून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक आवड निर्माण होण्यास मोठी मदत होणार आहे.
> **-डॉ. आर. आर. अहिरे,** प्राचार्य सी. गो. पाटील महाविद्यालय, साक्री

Dhule, Dhule-Today
12/02/2024 Page No. 3

# शिवविचारांचा जागर करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य- डॉ. चव्हाण

## सी.गो. पाटील महाविद्यालयात शिवराज्याभिषेक दिन साजरा



➤ धुळे । दै. मर्डर न्यूज

‘शिवकाळातली राजेशाही स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय प्रस्थापित करू शकली होती. त्यामुळे शिवविचारांचा जागर करणे समाजातील प्रत्येक घटकातील नागरिकांचे कर्तव्य आहे’; असे प्रतिपादन डॉ ज्ञानेश्वर चव्हाण यांनी केले. ते साक्रीतील विद्या विकास मंडळाच्या सी.गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात आयोजित शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याच्या कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, प्रमुख पाहुणे म्हणून आर. डी. देवरे महाविद्यालय म्हसदीच्या डॉ. वनिता पवार, राजेंद्र बोरसे हे उपस्थित होते.

प्रारंभी छ. शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पाहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांना मार्गदर्शन करतांना डॉ. चव्हाण म्हणाले की, ‘सत्तेचा केंद्रबिंदू सामान्य माणूस असला पाहिजे. तरच समाजाचे पर्यायाने राष्ट्राचे उत्थान होते, हे विचार छत्रपती शिवरायांनी ६ जून १६७४ रोजी राज्यभिषेकाच्या दिनी प्रत्यक्षात आणून दाखविले. छत्रपती शिवाजी महाराजांनी लोकशाहीची खऱ्या अर्थाने मुहूर्तमेढ रोवली. कोणत्याही राज्यात राज्याची जनता हीच सर्वश्रेष्ठ असते आणि तिचा विकास हेच प्रशासनाचे प्रथम कर्तव्य असते हे आपल्या कर्तृत्वातून शिवरायांनी साकार करून दाखवले आणि त्यातूनच ६ जून १६७४ रोजी शिवराज्याभिषेक संपन्न झाला. संपुर्ण भारत खंडात या दिनानिमित्ताने लोकशाहीचा पाया रचला गेला; असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख डॉ. प्रकाश साळुंखे यांनी केले. तर आभार के. डी. सूर्यवंशी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.दिनेश खैरनार, शरद बोरसे, प्रशांत बोरसे व दीपक मारनर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

Vidya Vikas Mandal's
Sitaram Govind Patil Arts, Science and Commerce College, Sakri Tal. Sakri Dist. Dhule 424 304

विद्या विकास मंडळाचे, सिताराम गोविंद पाटील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, साक्री ता. साक्री जि. धुळे ४२४ ३०४

ESTD 1971

Affiliated to Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

NAAC Re-Accredited with "A Grade" (CGPA 3.03) 3rd Cycle ◆ ISO 9001:2015 CERTIFIED ◆ AISHE ID : C - 8825 ◆ College Code : 210026

Website : www.sgpcsakri.com | Email : vidyavikas2006@gmail.com | Ph : 02568-242323

## Academic Year 2023-24

दवंडी Mob : 9372874650/9657804650 व्यक्ती विशेष dhuled

# माजी आ.कै.गोजरताई भामरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त विविध कार्यक्रम



साक्री (अनिल देसले दै. धुळे दवंडी) : आई-वडिलांची सेवा हीच सर्वश्रेष्ठ असून उच्चशिक्षित झालेल्या विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमांची संख्या कमी होण्यासाठी नेहमी प्रयत्नरत राहावे असे प्रतिपादन विद्या विकास मंडळाचे सचिव सुरेश पाटील यांनी केले.

विद्या विकास मंडळाचे सिताराम गोविंद पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री जि धुळे राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा विभाग व विद्यार्थी विकास विभाग आयोजित माजी आमदार कै सौ गुजरताई भामरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त " भव्य रक्तदान व रक्तगट तपासणी शिबीर तसेच युवती सभा उद्धाटनाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे उद्धाटन लोकनेते माणिकराव गावित महाविद्यालय विसरवाडीच्या प्राचार्य डॉ जयश्री माणिकराव गावित यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून विद्या विकास मंडळाचे प्रशासकीय अधिकारी डॉ डी एल तोरवणे, शासकीय रुग्णालय धुळे चे रक्तपेढी प्रमुख डॉ महेश जोशी, प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे, उपप्राचार्य डॉ अनंत पाटील, साक्री तालुक्यातील प्रतिष्ठित नागरिक प्रसंगी उपस्थित होते. उद्धाटना प्रसंगी प्राचार्य डॉ जयश्री गावित यांनी ज्या घटकांना व्यक्त होता येत नाही अशा आदिवासी महिलांचे नेतृत्व माजी आमदार कै सौ गोजर ताई भामरे यांनी सक्षम पद्धतीने केल्याचे मत व्यक्त केले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची योग्य जाणीव कै गोजरताईंना असल्यामुळे त्यांनी शेतकऱ्यांसाठी मोठा अभ्यास दौरा आयोजित केला होता. सामाजिक प्रश्नांची योग्य ती जाण ठेवून राजकारणात देखील त्यांनी आपला स्वतंत्र ठसा उमटवला. विद्यार्थिनींनी गोजरताईंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून मार्गक्रमण करावे असा देखील सल्ला त्यांनी प्रसंगी दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ अनंत पाटील यांनी केले. प्रसंगी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात ३३ सहभागीनी रक्तदान केले. तर २१५ विद्यार्थी विद्यार्थिनी मोफत रक्तगट तपासणी करून घेतली. त्याचबरोबर वनस्पती शास्त्र विभागामार्फत आयोजित सलाद डेकोरेशन स्पर्धेत देवश्री बागुल प्रथम, जो हा पठाण व आईशा पठाण द्वितीय, मेहेक शेख तृतीय व गायत्री कापडे व पूनम हिरे उत्तेजनार्थ,फ्लॉवर अरेंजमेंट स्पर्धेत नलिनी चांदुरकर प्रथम, यश वैष्णव द्वितीय, गोपाळ पावरा तृतीय, मयुरी खैरनार उत्तेजनार्थ, व फ्लॉवर रांगोळी स्पर्धेत दिव्या भामटे प्रथम, कुणाल सोनवणे व दुर्गेश घरटे द्वितीय, आदिती सरक तृतीय, हर्षदा अहिरराव व मनीषा पवार उत्तेजणार्थ क्रमांक प्राप्त केला.कार्यक्रमाचे संचालन डॉ चंद्रकांत कढरे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ पंकज अहिरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संयोजन समितीचे डॉ ज्ञानेश्वर चव्हाण, प्रा विश्वास भामरे, डॉ लहू पवार, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ प्रदीप राठोड, शारीरिक व क्रीडा संचालक डॉ हसीन खा तडवी,रासेयो सहाय्यक अधिकारी प्रा सुरेंद्र मगर, युवती सभेच्या प्रमुख ज्योती वाकोडे यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी बांधव व विद्यार्थी बहुसंख्येने होते.

पुण्य नगरी

# सी.गो. पाटील महाविद्यालयात एड्सबाबत जनजागृती



साक्री : येथील सी.गो. पाटील महाविद्यालयात जागतिक एड्स दिनानिमित्त महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व साक्री ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने एचआयव्ही एड्स आजाराबाबत जनजागृतीपर कार्यक्रम झाला. शपथ वाचन करण्यात येवून परिसरातून रॅली काढण्यात आली. कार्यक्रमाला ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. हर्षवर्धन चित्तम, प्राचार्य प्रा.डॉ. आर.आर.अहिरे यांचे मार्गदर्शन लाभले. ग्रामीण रुग्णालयाचे समुपदेशक योगेश नांद्रे यांनी एचआयव्हीबाबत मार्गदर्शन केले. उपप्राचार्य डॉ. आनंद पाटील यांनीही याबाबत माहिती दिली. दीपक सूर्यवंशी, ज्ञानेश्वर बिराडे आदी उपस्थित होते. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.प्रदीप राठोड, पर्यवेक्षक प्रा. डी.पी. पाटील, प्रा. भारती खैरनार, प्रा. पूजा पाटील, प्रा. बोरसे, प्रा. सोनवणे, प्रा. एस. टी. सूर्यवंशी यांचे सहकार्य लाभले.

Smart Dhule Edition
Dec 4, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com

# Academic Year 2023-24

सकाळ TODAY

## 'मेरी माटी-मेरा देश' अभियानांतर्गत साक्री महाविद्यालयात अमृतकलश यात्रा

म्हसदी, ता. १४ : 'मेरी माटी-मेरा देश' अभियानात विद्यार्थ्यांना व सर्व भारतीयांना प्रोत्साहित केले जात असल्याचे मत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी व्यक्त केले.

साक्रीत विद्या विकास मंडळाच्या सीताराम गोविंद पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात 'मेरी माटी-मेरा देश' अभियानांतर्गत अमृतकलश यात्रेप्रसंगी ते बोलत होते. यात्रेत भाजपचे ज्येष्ठ नेते, विद्या विकास मंडळाचे सचिव सुरेश पाटील यांनीही मार्गदर्शन केले. प्राचार्य राजेंद्र अहिरे, उपप्राचार्य डॉ अनंत पाटील, 'रासेयो'चे विभागीय समन्वयक प्रा. विश्वास भामरे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, 'रासेयो' कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड उपस्थित होते. डॉ. नांद्रे यांनी देशभरातून अमृतकलश २९ ऑक्टोबरला कर्तव्य पथावर आणून तेथे अमृतवाटिका तयार करण्यात येणार असल्याचे सांगितले. प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे यांनी विद्यार्थी व समाजामध्ये देशप्रेमाची भावना निर्माण होण्यासाठी महान विभूतींना आदरांजली देण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले.



साक्री : अमृतकलश यात्रेत शनिवारी सहभागी झालेले भाजपचे प्रांतिक सदस्य तथा ज्येष्ठ नेते सुरेश पाटील, प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, प्राध्यापक व विद्यार्थी.

अमृतकलश यात्रेचा प्रारंभ महाविद्यालयातून होत साक्री शहरातील प्रमुख रस्त्यावरून जात एसटी आगारात सांगता झाली. सांगतेप्रसंगी डॉ. सचिन नांद्रे मार्गदर्शन केले. रासेयोचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. सुरेंद्रसिंग मगर, डॉ.ज्योती वाकोडे, शरद बोरसे, प्रशांत बोरसे, स्वप्नील देवरे यांनी प्रयत्न केले.

सकाळ

## स्वतः मतदान करा अन् इतरांनाही प्रेरित करा

### जितेंद्र बर्डे : साक्रीत मतदान जनजागृतीसाठी रॅली

■ सकाळ वृत्तसेवा

म्हसदी, ता. २८ : मतदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य असून, प्रत्येकाने स्वतः मतदान करत असतानाच इतरांनादेखील मतदान करण्यासाठी प्रेरित करावे, अशी अपेक्षा साक्री तालुक्याचे भूमिपुत्र अभिनेते, दिग्दर्शक व साक्री तालुक्याचे मतदान ब्रॅन्ड ॲम्बॅसिडर जितेंद्र बर्डे यांनी व्यक्त केली.

भारत निवडणूक आयोग, युवा कार्य व खेळ मंत्रालय रासेयो क्षेत्रीय निर्देशनालय (पुणे), कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, निवडणूक साक्षरता मंडळ, साक्री येथील सी. गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग, साक्री येथील तहसील कार्यालय यांच्यातर्फे झालेल्या मतदान जागृती रॅलीच्या समारोपप्रसंगी श्री. बर्डे बोलत होते. उपजिल्हा निवडणूक अधिकारी नितीनकुमार मुंडावरे, साक्रीचे तहसीलदार साहेबराव सोनवणे, प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील, गटशिक्षणाधिकारी राजेंद्र पगारे, निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार राजेंद्र सोनवणे उपस्थित होते. मतदार जागृती रॅलीचा आरंभ महाविद्यालयाच्या प्रांगणापासून होत साक्री शहरातील विविध भागांतून रॅलीद्वारे मतदारांना जागरूक करण्यात आले. एसटी आगाराच्या आवारातील ज्येष्ठ नागरिकांना मतदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांनी समजावून सांगितले. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी आगाराच्या परिसराची स्वच्छता केली. रॅलीत ज्येष्ठ नागरिकांनीदेखील सहभाग नोंदविला. रॅलीचा समारोप तहसील कार्यालयात झाला. समारोपप्रसंगी उपजिल्हा निवडणूक अधिकारी मुंडावरे यांनी मतदान प्रक्रिया भारतीय लोकशाही सक्षम करण्यासाठी महत्त्वपूर्ण असून, प्रत्येक भारतीय नागरिकाने आपल्या मतदानाचा अधिकार बजावत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले. तहसीलदार साहेबराव सोनवणे यांनी नवमतदारांनी मतदानाचे कर्तव्य पार पाडत असताना इतरांनादेखील या संदर्भात जागृत करण्याचा सल्ला दिला. पिंपळनेरचे भटू कोठावदे यांनी तालुक्यातील विविध भाषांमध्ये मतदान करण्याचे आवाहन मतदारांना केले. कबचौ उमवि जळगाव राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सचिन नांद्रे, प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. नोडल अधिकारी डॉ. लहू पवार, राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा. विश्वास भामरे, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. डी. पी. पाटील, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. सुरेंद्र मगर, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.




साक्री : सी. गो. पाटील महाविद्यालयात मतदार जनजागृती रॅलीचा समारोप करताना तालुका ब्रॅन्ड ॲम्बेसिडर जितेंद्र बर्डे. शेजारी उपजिल्हा निवडणूक अधिकारी नितीनकुमार मुंडावरे, तहसीलदार साहेबराव सोनवणे, प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे.

Dhule, Dhule-Today
29/03/2024 Page No. 3

# Academic Year 2023-24




Gandhi Jayanti




Constitution Preamble Reading

# Academic Year 2023-24



**Outreach Program**

सकाळ

## तंबाखूमुक्त जीवन स्वीकारून सुदृढ समाजनिर्मितीच्या दिशेने वाटचाल करा

■ सकाळ वृत्तसेवा

म्हसदी, ता. १२ : तंबाखूचे सेवन करणे आरोग्याच्या दृष्टिकोनातून घातक असून, महाविद्यालयीन तरुणांनी तंबाखूमुक्त जीवन स्वीकारून सुदृढ समाजनिर्मितीच्या दिशेने वाटचाल करावी, अशी अपेक्षा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी शनिवारी (ता. ११) व्यक्त केली.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व विद्या विकास मंडळाच्या सीताराम गोविंद पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात 'तंबाखू खाण्याचे दुष्परिणाम व तंबाखूमुक्त जीवन' विषयावर झालेल्या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे अध्यक्षस्थानी होते. उपप्राचार्य डॉ. आनंद पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा. विश्वास भामरे उपस्थित होते. उपस्थित विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना तंबाखूमुक्त जीवनाची शपथ देण्यात आली. डॉ. नांद्रे यांनी तंबाखूच्या सेवनामुळे कर्करोगासारखा दुर्धर आजार होतो. तंबाखू सेवन करणाऱ्या व्यक्तीसोबत त्याच्या कुटुंबालादेखील असह्य दुःखाला सामोरे जावे लागते. म्हणून प्रत्येकाने या व्यसनापासून दूर राहण्याचा संकल्प करून स्वतःसोबत कुटुंबाचा व पर्यायाने समाजाचा विकास साधावा आवाहन केले. कायमस्वरूपी असलेला व्यसनमुक्त प्रतिज्ञा फलक महत्त्वाचा असल्याचे मतदेखील त्यांनी व्यक्त केले. डॉ. नांद्रे यांनी 'तारीख तेरा मतदान मेरा' या मोहिमेचा उल्लेख करत सर्वांनी मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन केले. डॉ. राजेंद्र अहिरे यांनी महाविद्यालय संस्कारांची शाळा असून, विद्यार्थ्यांना यशस्वी आयुष्य प्रदान करत असतानाच निरामय आयुष्य जगण्याच्या दृष्टिकोनातूनदेखील महाविद्यालय नेहमी प्रयत्न करत असते, असे मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा असून, व्यसनमुक्त जीवन व्यतीत करण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### सी. गो. पाटील महाविद्यालयात तंबाखूमुक्त जीवनाची शपथ



साक्री : सी. गो. पाटील महाविद्यालयात तंबाखूमुक्त जीवनाची शपथ देताना राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सचिन नांद्रे, प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे व प्राध्यापक.

Dhule, Dhule-Today
13/05/2024 Page No. 8

**Tobacco Free Campus Initiative**

# Academic Year 2023-24

## जल जीवन मिशन पाणी नियोजनाचे शाश्वत अभियान - राजेंद्र अहिरे

(युनायटेड खान्देश न्यूज)

साक्री, दि.६- जल जीवन मिशन हे महाराष्ट्र राज्याच्या पाणी नियोजनाचे शाश्वत अभियान आहे ते राज्याच्या तरुण वर्गाने जोपासले पाहिजे ,असे मत जल जीवन मिशन अंतर्गत होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धे च्या उद्घाटन समारंभ प्रसंगी प्राचार्य,डॉ. राजेंद्र अहिरे यांनी व्यक्त केले.

ते जल जीवन मिशन महाराष्ट्र शासन तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटन समारंभ निमित्त बोलत होते. या वक्तृत्व स्पर्धेला वरिष्ठ गटातून एकूण बारा विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला तर कनिष्ठ गटातून वीस विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. वरिष्ठ गटातून प्रथम क्रमांक कुमारी हर्षदा देवरे हिने तर द्वितीय क्रमांक चेतन सूर्यवंशी



व तृतीय क्रमांक क्रांती मोरे हिने पटकावला. तर कनिष्ठ गटातून प्रथम क्रमांक विमल कुमारी चौधरी, द्वितीय क्रमांक योजना दहीते, तृतीय क्रमांक हर्षदा जगताप हिने पटकावला. या स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.हे विद्यार्थी जिल्हा स्तरावरील होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत.

जिल्हास्तरावर बक्षीसांच स्वरूप हे दोन्ही गटांसाठी स्वतंत्र प्रथम क्रमांकासाठी २१ हजार रुपये रोख व प्रमाणपत्र तसेच द्वितीय क्रमांक साठी ११००० रुपये रोख व प्रमाणपत्र तसेच तृतीय क्रमांकासाठी पाच हजार पाचशे रुपये रोख व प्रमाणपत्र मिळणार आहे .यावेळी कार्यक्रमाला डॉ. प्रकाश साळुंखे , डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांनी स्पर्धेचे परीक्षण केले.

या स्पर्धेचे धुळे जिल्हा परिषद पाणी स्वच्छता मिशनचे समन्वयक दीपक देसले व प्रा. विश्वास भामरे यांनी केले होते यावेळी टाईम कीपर म्हणून डॉ. सचिन गोवर्धने यांनी भूमिका पार पाडली तसेच अनंत देवरे ,पराग भामरे, हरी बेडसे यांनी यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

**Jal Jivan Mission Program**

## ग्राहक दिनानिमित्ताने साक्री येथे सी.गो.पाटील महाविद्यालयात कार्यक्रम संपन्न

• बाळकडू : प्रवीण सुर्यवंशी
संपर्क.९७६३०३८०५३
००५ साक्री (धुळे):

लहानांपासून तर मोठ्यापर्यंत प्रत्येक व्यक्ती ही ग्राहक असून ग्राहक म्हणून आपली होणारी फसवणूक टाळायची असेल तर सजग राहिल्या शिवाय तुम्ही आर्थिक शोषणमुक्त होणार नाही असे प्रतिपादन पी.झेड.कुवर यांनी केले.२४ डिसेंबरच्या राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या पार्श्वभूमीवर, साक्री तालुका ग्राहक पंचायतीच्या वतीने सजग विद्यार्थी ग्राहक या विषयीच्या प्रबोधनासाठी ग्राहक पंचायतीचे जिल्हा सहसंघटक पी. झेड.कुवर हे साक्री येथील सी.गो.पाटील महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे




प्राचार्य व साक्री तालुका ग्राहक पंचायतीचे सदस्य डॉ. राजेंद्र अहिरे होते. तर प्रमुख पाहूणे पर्यवेक्षक प्रा. डी.पी.पाटील, प्रा. डॉ. लहू पवार उपस्थित होते. यावेळी श्री कुवर म्हणाले की, विद्यार्थ्यांना ग्राहक पंचायतीच्या स्थापनेमागे ग्राहक तीर्थ बिंदू माधव जोशी यांचा हेतू स्पष्ट करीत ग्राहकांची बाजारातून होणारी आर्थिक लूट याबाबत जागरूक कसे रहावे याबाबत विवेचन केले.१९८६ पासून ग्राहक संरक्षण कायदा लागू झाला परंतु या कायद्याविषयी ग्राहक हार्दिक अनाभिज्ञ होता. त्या ग्राहकाला जागरूक करण्याचे काम ग्राहक पंचायतीच्या माध्यमातून केले जात आहे. यासहा ग्राहकांची फसवणूक कोणकोणत्या ठिकाणी होते याची अनेक उदाहरणे देत स्पष्ट केले.

डॉ. राजेंद्र अहिरे यांनी विद्यार्थ्यांनी ग्राहक पंचायत च्या वतीने आयोजित निबंध स्पर्धेत भाग घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राप्र. कमलेश सूर्यवंशी यांनी केले तर प्रा. चेतन पदमर यांनी आभार मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. एस. टी. सूर्यवंशी, प्रा. श्रीमती बी. एन. खैरनार, श्रीमती आर. एन. देवरे, श्रीमती पी. पी. पाटील, एस. वाय. बोरसे, वाय. एस. पवार यांनी परिश्रम घेतले यावेळी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

**Customer Awareness Initiative**

# Academic Year 2023-24

सकाळ TODAY



साक्री : सी. गो. पाटील महाविद्यालयात एड्स जनजागृती रॅलीत सहभागी विद्यार्थी व प्राध्यापक.

## साक्रीत एड्स जनजागृतीसाठी रॅली

म्हसदी : साक्री येथील सी. गो. पाटील महाविद्यालयात १ डिसेंबरला जागतिक एड्स दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभाग व साक्री ग्रामीण रुग्णालय यांच्यातर्फे एचआयव्ही एड्सबाबत जनजागृती कार्यक्रम व शपथवाचन रॅली काढण्यात आली. ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. हर्षवर्धन चित्तम व सी. गो. पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. आर. आर. अहिरे यांनी मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमात ग्रामीण रुग्णालय समुपदेशक योगेश नांद्रे यांनी एचआयव्ही एड्स आजाराबाबत मार्गदर्शन केले. उपप्राचार्य डॉ. आनंद पाटील यांनीही माहिती दिली. ग्रामीण रुग्णालयातील दीपक सूर्यवंशी, ज्ञानेश्वर बिराडे उपस्थित होते. रासेयो योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. डी. पी. पाटील, प्रा. भारती खैरनार, प्रा. पूजा पाटील, प्रा. बोरसे, प्रा. सोनवणे, प्रा. एस. टी. सूर्यवंशी यांचे सहकार्य लाभले. प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**AIDS Awareness Rally**

# राष्ट्रनिर्मितीत रासेयोच्या स्वयंसेवकांचे योगदान

## डॉ. अजय शिंदे : साक्रीत रासेयोच्या राष्ट्रीय वेबिनारसाठी ऑनलाइन मार्गदर्शन

सकाळ वृत्तसेवा

म्हसदी, ता. २९ : राष्ट्रासमोर तथा समाजासमोर येणाऱ्या विविध संकटांना सामोरे जाण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून तयार झालेले स्वयंसेवक नेहमी सक्रियतेने आपले योगदान देऊन स्वतःला सिद्ध करतात असल्याचे मत राष्ट्रीय सेवा योजनेचे महाराष्ट्र व गोव्याचे क्षेत्रीय समन्वयक डॉ. अजय शिंदे यांनी व्यक्त केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व साक्री येथील विद्या विकास मंडळाच्या सीताराम गोविंद पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय यांच्यातर्फे झालेल्या 'राष्ट्रनिर्मितीत राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान' या विषयावरील राष्ट्रीय वेबिनारप्रसंगी ते बोलत होते. वक्ते म्हणून राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक देवेंद्र खन्ना, प्रतीक कदम उपस्थित होते. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सचिन नांद्रे प्रमुख पाहुणे होते. प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे अध्यक्षस्थानी होते. उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील उपस्थित होते. डॉ. सचिन नांद्रे यांनी मार्गदर्शन केले. वक्ते देवेंद्र खन्ना यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास जागृत केला जातो. ज्याच्या आधारे विद्यार्थ्यांच्या स्वयंविकासासोबतच इतरांप्रतिचे कर्तव्यदेखील त्याला ज्ञात होते. दुसरे वक्ते प्रतीक कदम यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना राष्ट्रपती पुरस्कारप्राप्तीसाठी कोणते गुण स्वयंसेवकांमध्ये असावेत यासंबंधीची माहिती दिली. राष्ट्रीय सेवा योजनेतील त्यांचे अनुभवकथन केले. डॉ. राजेंद्र अहिरे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून समाजातील विविध विषयांचे ज्ञान विद्यार्थ्यांना होऊन परिपक्व व सक्षम विद्यार्थी घडविण्याचे कार्य या माध्यमातून होत असल्याचे मत व्यक्त केले. एकूणच राष्ट्रीय सेवा योजनेची कार्यपद्धती खऱ्या अर्थाने राष्ट्रनिर्मितीच्या कामात भरीव योगदान देत असल्याचेही ते म्हणाले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रदीप राठोड यांनी सूत्रसंचालन केले. आयक्यूएसीचे समन्वयक ज्ञानेश्वर चव्हाण यांनी आभार मानले. रासेयोच्या महिला कार्यक्रम अधिकारी ज्योती वाकोडे व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. सुरेंद्रसिंग मगर यांनी परिचय करून दिला केला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संयोजन समितीचे सदस्य रासेयो विभागीय समन्वयक प्रा. विश्वास भामरे, डॉ. दीपक नगराळे, डॉ. हसीनखा तडवी यांनी प्रयत्न केले.




साक्री : सी. गो. पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय वेबिनारला ऑनलाइन मार्गदर्शन करताना विविध क्षेत्रांतील मान्यवर.

सकाळ ३०/११/२०२३

**National Webinar**